# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 16 August 2024
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १६ ऑगस्ट २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- महिला बचतगट आणि महिला उद्योजकांच्या उत्पादनांना राष्ट्रीय स्तरावर बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश
- राज्य विधानसभेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीचा मेळावा
- ७० वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार जाहीर–'वाळवी' हा सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट

आणि

- लातूर इथं जिल्हा स्थापना दिनापासून हेरिटेज वॉकला प्रारंभ

****

राज्यातील महिला बचतगट आणि महिला उद्योजकांनी तयार केलेल्या उत्पादनांना राष्ट्रीय स्तरावर बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आर्टीफिशिअल इंटेलिजन्स आधारीत डिजीटल मार्केटींग ॲप विकसित करण्याची सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. आज मुंबईत सह्याद्री अतिथीगृहात याबाबत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. यासाठी उमेद, एनयुएलएम, माविम यांनी एकत्रित येऊन एक व्यासपीठ निर्माण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

शहरांमध्ये बचतगटांची संख्या वाढवावी, जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मैदांनावर सुटीच्या दिवशी बचतगटांसाठी विक्री कक्षांची व्यवस्था करून द्यावी. ग्रामीण भागातील बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तू शहरांमधील बाजारपेठेत उपलब्ध करून द्याव्यात, महानगरांमध्ये बचत गट, महिलांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंना स्टॉलची उभारणी करण्यासाठी महापालिकांनी पुढाकार घ्यावा, आदी सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या. यावेळी धर्मवीर आनंद दिघे महारोजगार ॲपच्या माध्यमातून

शासकीय स्तरावर असंघटीत कामगारांचे डिजीटल जॉबकार्ड तयार करण्याची संकल्पना यावेळी सादर करण्यात आली.

राज्यात उमेद अंतर्गत सुमारे सहा लाख, एनयुएलएम अंतर्गत ३१ हजार, माविम अंतर्गत ग्रामीण ८७ हजार आणि शहरी ६५ हजार असे एकूण सात लाख ८२ हजार बचत गट कार्यरत आहेत.

****

राज्य विधानसभेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेण्यात आला. निवडणुकीला सामोरं जाण्यासाठी महाविकास आघाडी तयार असल्याचं प्रतिपादन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी या मेळाव्याला संबोधित करताना केलं. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करावा, आपला त्याला पाठिंबा आहे, अशी ग्वाही ठाकरे यांनी दिली. राज्यात जागावाटपाची घोषणा लवकरात लवकर करावी, जेणेकरून सर्वांना कामाला लागता येईल, असं मत खासदार सुप्रिया सुळे यांनी मांडलं. कार्यकर्त्यांनी कामाला लागण्याच्या सूचना बाळासाहेब थोरात यांनी केली.

****

राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीसाठी केंद्रीय निवडणूक आयोगानं वंचित बहुजन आघाडी आणि प्रहार जनशक्ती पक्षाला निवडणूक चिन्हांचं वाटप केलं आहे. वंचित आघाडीला गॅस सिलिंडर तर प्रहार जनशक्ती पक्षाला क्रिकेटची बॅट हे चिन्ह दिले आहे. तर जातीय सेना पक्षाला कोबी हे चिन्ह निवडणूक आयोगानं दिलं आहे.

****

भंडारा गोंदियाचे भारतीय जनता पक्षाचे माजी खासदार शिशुपाल पटले यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या उपस्थितीत आज मुंबईत टिळक भवन इथं काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्यांच्या पक्ष प्रवेशामुळे पूर्व विदर्भात काँग्रेस पक्ष संघटना अधिक मजबूत होणार आहे, असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितलं.

****

महाराष्ट्र राज्यात होणार असलेल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगानं राज्यात यावर्षीच्या दुसऱ्या विशेष संक्षित पुनरीक्षण कार्यक्रमाची घोषणा केली आहे. या कार्यक्रमअंतर्गत पात्र नव मतदारांच्या नोंदणीसह विद्यमान मतदारांसाठी मतदार यादीतील आपल्या तपशीलामध्ये बदल, दुरुस्त्या, अद्ययावतीकरण करण्याची संधी उपलब्ध आहे. यात एक महत्वाची बाब म्हणजे मतदारांनी मतदार यादीतील आपल्या नावासोबतच स्वतःचा भ्रमणध्वनी अर्थात मोबाईल क्रमांक जोडू शकतात. यात मतदारांसाठी दावे आणि हरकतींसाठी २० ऑगस्ट २०२४ पर्यंतचा कालावधी निश्चित केला गेला आहे.

दरम्यान, केंद्रीय निवडणूक आयोगाने जम्मू काश्मीर आणि हरियाणात विधानसभेच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला. जम्मू काश्मीर विधानसभेच्या ९० जागांसाठी १८ सप्टेंबर, २५ सप्टेंबर आणि एक ऑक्टोबर अशा तीन टप्प्यात तर हरियाणातल्या ९० जागांसाठी एक ऑक्टोबरला एकाच टप्प्यात मतदान होईल. दोन्ही राज्यातल्या मतदानाची मोजणी चार ऑक्टोबरला होणार आहे.

****

मानवी आहारात रानभाज्याचे अनन्य साधारण महत्त्व असून, रानभाज्यांची नवीन पिढीला ओळख होण्यासाठी जनजागृती आवश्यक असल्याचं राज्याचे ग्रामविकास, पंचायत राज आणि पर्यटन मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी म्हटलं आहे. ते आज धुळे इथं जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सव उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी पालकमंत्री महाजन यांच्या हस्ते रानभाज्यांची मांडणी केलेल्या शेतकऱ्यांना प्रशस्तीपत्रं प्रदान करण्यात आली. यावेळी रानभाज्या विषयक उपयुक्त माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आलं.

****

७० वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आज जाहीर झाले. यामध्ये सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा पुरस्कार 'वाळवी' या चित्रपटानं पटकावला. माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं आज या चित्रपटांची घोषणा केली. नॉन फीचर विभागात साहिल वैद्य दिग्दर्शित 'आदीगुंजन' या मराठी माहितीपटानं सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा मान मिळवला. याच माहितीपटासाठी सुमंत शिंदे यांना सर्वोत्कृष्ट व्हॉइस ओव्हरसाठी पुरस्कार जाहीर झाला. सर्वोत्कृष्ट कला-संस्कृतीविषयक चित्रपटाचा मान सचिन सूर्यवंशी यांच्या 'वारसा' या मराठी चित्रपटानं पटकावला. तर 'आणखी एक मोहंजोदारो' हा सर्वोत्कृष्ट ऐतिहासिक चित्रपट ठरला.

गुलमोहर हा सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट ठरला.

'तिरुचित्रम बलम' या चित्रपटासाठी नित्या मेनन तर 'कच्छ एक्सप्रेस' या चित्रपटासाठी मानसी पारेख यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पुरस्कार, 'कांतारा' या कन्नड चित्रपटातल्या भूमिकेसाठी ऋषभ शेट्टी याला सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार, तर 'ऊँचाई' या चित्रपटासाठी सूरज बडजात्या यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शनाचा पुरस्कार पोन्नियन सेल्वन भाग १ या तमिळ चित्रपटासाठी ए. आर. रेहमान आणि ब्रह्मास्त्र- भाग १ शिवा या हिंदी चित्रपटासाठी प्रीतम यांना विभागून जाहीर झाला. सर्वोत्कृष्ट पार्श्वगायकाचा पुरस्कार 'केसरिया' या गाण्यासाठी अरिजीत सिंह यानं पटकावला आहे

****

पद्म पुरस्कार २०२५ साठीची नामांकनं येत्या १५ सप्टेंबर पर्यंत स्वीकारली जाणार आहेत. यासाठी awards.gov.in या संकेतस्थळावर इच्छुकांनी भेट देण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

****

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या धाराशिव इथल्या उपपरिसरात पीएच डी साठी घेण्यात येणाऱ्या पेट या पात्रता परीक्षेचं केंद्र सुरू व्हावं, अशी मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद संचलित विद्यापीठ विकास मंचने केली आहे. या मागणीचं निवेदन प्र-कुलगुरू डॉक्टर वाल्मिक सरवदे यांच्याकडे सादर करण्यात आलं आहे. पीएच डीचा व्हायव्हा अर्थात तोंडी परीक्षाही उपकेंद्रात घेण्यास विद्यापीठाने परवानगी द्यावी अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

****

लातूर जिल्ह्यातील इतिहासाची साक्ष देणारी वारसा स्थळं आणि त्या संबंधित इतिहासाची माहिती नवीन पिढीला व्हावी यासाठी इतिहासप्रेमी नागरिक, इतिहास अभ्यासक आणि लातूर जिल्हा प्रशासनानं 'लातूर हेरिटेज वॉक' हा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. आज लातूर जिल्हा स्थापना दिनाचं औचित्य साधून या अभियानाची सुरुवात करण्यात आली. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे तसंच प्रशासनातील अधिकाऱ्यांनी फित कापून शहरातील हनुमान चौक इथं या उपक्रमाची सुरुवात केली. हा हेरिटेज वॉक गंजगोलाई जवळ आल्यानंतर शहरातील पुरणमल

लाहोटी शाळेतील विद्यार्थ्यांनी ‘शंभरीची झाली गोलाई...’ या गीतावर नृत्य सादर केलं.

****

परभणी जिल्हाधिकारी कार्यालय, महानगरपालिका आणि जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमानं “हर घर तिरंगा” या अभियाना अंतर्गत जिल्हास्तरीय देश भक्तीपर समूहनृत्य स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत जिल्हाभरातून ३१ स्पर्धक शाळांनी सहभाग नोंदवला. यामध्ये जिल्हा परिषदच्या पाथरी तालुक्यातल्या वडी इथल्या प्राथमिक शाळेनं प्रथम क्रमांक पटकावला. जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्यासह प्रशासनातील अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचं अभिनंदन आणि कौतुक केलं.

****

बीड इथं महसूल विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांचं निवेदन पालकमंत्री धनंजय मुंडे यांना सादर केलं आहे. ज्येष्ठता यादी, पदोन्नती, यासह विविध प्रश्नांकडे यातून लक्ष वेधण्यात आलं आहे.

****

बांगलादेशात अल्पसंख्याक हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ आज राज्यात अनेक ठिकाणी निषेध मोर्चा काढून बंद पाळण्यात आला. नाशिकमध्ये या बंदला संमिश्र प्रतिसाद मिळाला. दवाखाने, शासकीय कार्यालये आणि औषधांची दुकाने वगळता बहुतांश बाजारपेठेतील दुकाने बंद होती. जळगाव इथं जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून बंद पाळण्यात आला. काही अपवाद वगळता हा बंद शांततेत पार पडल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****